# दिनांक १८.०४.२०२४ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे लगतच्या कक्षा मध्ये दिनांक १८.०४.२०२४ रोजी दु. ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
मा.पर्यावरण अधिकारी, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.२, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.५, महानगरपालिका, अमरावती
श्री.अनिल घोम वृक्ष तज्ञ, अमरावती
उद्यान निरीक्षक, महानगरपालिका, अमरावती

**विषय क्रमांक :- १)** दिनांक ०७.०२.२०२४ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यावृतांत समितीच्या अवलोकनार्थ
२) दिनांक ०७.०२.२०२४ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृतांत निर्णयाप्रमाणे कार्यपूर्ती अहवाल

## उत्तर झोन क्र.१

अर्ज क्रमांक १:– मुख्याध्यापक, विद्याभारती माध्यमिक विद्यालय, पत्रकार कॉलनी, अमरावती कडुबदाम व इतर वृक्ष ०८ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पत्रकार कॉलनी, विद्याभारती माध्यमिक विद्यालय, अम. या शाळेच्या आवारातील विविध प्रकारच्या झाडांच्या फांद्या इलेक्ट्रीक तारात गेलेल्या असल्यामुळे विद्यार्थ्यांना धोका होण्याची शक्यता लक्षात घेता, तातडीने या सर्व झाडाच्या फांद्या म.न.पा उद्यान विभागाने MSEB च्या सहकार्याने तोडण्याला परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रीक दस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक १:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २:– श्री.कर्नल आर.डी. गौर ECHS , पॉलिक्लीनीक, अमरावती विविध प्रजातीचे

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता उंबराचे झाडांच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रीक दस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक २:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ३ :– श्री.शशिकांत मारोतराव भामकर, राधानगर, अमरावती सुबाभुळ, बोर वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराच्या फ्लॅट मध्ये सदर झाडे नाहीत. झाडे ज्यांच्या हद्दीत असेल त्यांचा अर्ज किंवा ना-हरकत अर्ज प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करता येईल, असे तांत्रीक दस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक ३:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ४ :– श्री. प्रेमकुमार हरिनारायण बजाज, व श्री.ओमप्रकाश हरिनारायण बजाज, सहकार नगर, अमरावती कडुलिंब-२,वाळलेला कडुलिंब-१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता दोन हिरवे झाड व एक वाळलेला दोन हिरव्या झाडांची बांधकाम परवानगी प्राप्त असुन दोन्ही झाडे बांधकाममध्ये अडथळा निर्माण करीत आहे. करीता नियमानुसार अनामत रक्कम घेवून परवानगी देण्यास हरकत नसावी, असे तांत्रीक सदस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक ४:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत ठेव रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ५ :– श्रीमती शिल्पा सागर घायसुंदर, कोणार्क कॉलनी, अमरावती सागवान-१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता नियमानुसार अनामत रक्कम घेवून एक सागाचे झाड काढण्याला परवानगी देण्यास हरकत नाही. सोबत बांधकाम परवानगी जोडलेली आहे असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे.

ठराव क्रमांक ५:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत ठेव रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ६ :– उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.२, अमरावती कडुलिंब-२५, कडुबदाम-५,गोधण-५ व इतर १०

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता शेगांव-रहाटगांव मासोद-परसोडा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करण्याकरीता उपविभागीय अभियंता सा.बां. त्या झाडांवर नंबर टाकून सोबत तोडावयाच्या झाडांची नंबरची यादी जोडलेली आहे. त्या यादीप्रमाणे ७० पैकी ४५ वृक्ष नियमाप्रमाणे अनामत रक्कम घेवून परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रीक सदस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक ६:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत ठेव रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ७ : – श्री. ज्ञानेश्वर राजाराम वानखडे, न्यु हनुमान नगर, व्हि.एम.व्हि. रोड, अमरावती आंबा-१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता आंब्याचे झाड झुकलेले आहे. तोडण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. पुन्हा त्याच जागेवर आंब्याचे झाड लावण्याचे अटीवर परवानगी देण्यात यावी, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे.

ठराव क्रमांक ७:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत ठेव रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ८ : – श्री.संजय बा. काळे, गुणवंतवाडी, अमरावती कडुलिंब-१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सौ.गंगाबाई सोळंके यांचा अर्ज व तक्रारकर्त्याच्या अर्जात तफावत आहे. कडुलिंबाचे झाड रस्त्यावर हिरवेगार आहे. झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व तक्रारकर्त्याला झाडाला इजा करू नये, असे कळविण्यात यावे, असे तांत्रीक सदस्याचे मत आहे.

ठराव क्रमांक ८:- सदर प्रकरणी वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे व झाडाला इजा पोहोचू नये असे तक्रारकर्त्याला आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ९ : – श्री.विजय बापुरावजी भोजने, सहजानंद नगर, मोर्शी रोड, अमरावती आंबा-१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता आंब्याचे झाड पुर्ण वाळलेले आहे. परंतु सदर झाड नैसर्गिक रित्या वाळलेले नसुन झाडाच्या खोडाला रिंग (करवा) करून, वाळविल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याचे फोटो घेण्यात आलेले आहे. त्यामुळे या प्रकरणात वृक्ष प्राधिकरणाकडून दंडात्मक कार्यवाही होण्याकरीता तशा पध्दतीने प्रकरण वृक्ष प्राधिकरणा समोर सादर करावे, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे.

ठराव क्रमांक ९:- सदर प्रकरणी दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी व पाच झाडे लावण्याचे अर्जदारास आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १० : – अर्जुन नगर बगीचा येथील चंदनाचे झाड अज्ञात व्यक्ती कडून तोडून नेल्याबाबत. चंदन-१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता वृक्षाचा पंचनामा तयार करण्यात आला आहे व गाडगेनगर पोलिस स्टेशनला F.I.R दाखल करण्यात आली.

ठराव क्रमांक १०:- सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कडून प्रकरणाचा पाठपुरवठा करण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ११ :– श्री.अनिरूध्द एस. उगले, वलगांव यांचा तक्रारअर्ज विविध प्रजातीचे वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आज दि.१६/०४/२०२४ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता संबधीत विभागाला प्राप्त तक्रारीच्या व फोटो सह पत्र देवून माहिती घेण्यात यावी, असे तांत्रीक सदस्याचे मत आहे.
ठराव क्रमांक ११:- सदर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

## झोन क्र.२

अर्ज क्रमांक १ :– श्री. चंद्रकात जनार्दनराव निचळ,रुख्मीनी नगर,डफळे हॉस्पीटलसमोर,अमरावती. काशीदवृक्ष १, फांदया
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. काशीद वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेलो व हिरवागार आहे. अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांदया उदयान विभाग मनपा यांच्या यंत्राव्दारे फांदया काढण्यास हरकत नाही. फांदया तोडण्याच्या कार्यवाही करीता परवानगी उद्यान विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर. जा.क्रं. ८२४ दि. ११/०३/२०२४
ठराव क्रमांक १:- सदर प्रकरणी फांद्या तोडण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २ :– श्री. मनोहर वैरागळे व इतर रुख्मीनी नगर , अतुल मंगल कार्यालया जवळ. अमरावती. काशीद वृक्ष ३, फांदया
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. श्री. वैरागळे यांच्या घरासमोरील रस्त्यातील काशीद वृक्षाचा पश्चिमेकडील वृक्षाचा अर्धभाग तसेच घराकडे झुकलेल्या फांदया काढून टाकण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच जोशी व अतूल मंगल कार्यालया कडील काशीद वृक्षाच्या तसेच रस्त्यावरील एका काशीद वृक्षाच्या एकूण दोन वृक्षाच्या रस्त्याकडे झुकलेल्या फांदया काढण्याची हरकत नाही. उदयान विभाग मनपा यांच्या मार्फत यंत्राव्दारे फांदया काढण्यास हरकत नाही. फांदया तोडण्याच्या कार्यवाही करीता परवानगी उद्यान विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर. जा.क्रं. ८२५ दि. ११/०३/२०२४
ठराव क्रमांक २:- सदर प्रकरणी फांद्या तोडण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ३ :– डॉ. अपेक्षित गुलाबराव बागडे सबनिस प्लॉट, डॉ. आंबेडकर बगीच्या जवळ अमरावती. करंज वृक्ष १, फांदया
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. मनपाचे उद्यानात असलेला करंज वृक्षाचे पाने अर्जदाराचे आवारात पडतात . सबब उद्यानातील अर्जदाराचे घराकडे झुकलेला २-४ इंच व्यासाच्या फांदया उद्यान विभागाने काढून टाकण्यात यावे. असे

सुचित करण्यात यावे. फांदया तोडण्याच्या कार्यवाही करीता परवानगी उद्यान विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर. जा.क्रं. ८२६ दि. ११/०३/२०२४

<u>ठराव क्रमांक</u> ३:- सदर प्रकरणी फांद्या तोडण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

<u>अर्ज क्रमांक ४</u>:- सौ. भारती कन्हैयालाल मालविया जनार्दन पेठ, ओसवाल भवन जवळ, अमरावती. अशोका वृक्ष १, फांदया महारुग वृक्ष वाळलेला १

<u>वृक्ष अधिकारी यांचा अहवाल</u> - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे घराचे आवारात अशोका वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. विद्युत तारेकडे झुकलेल्या २-३इंच व्यासाच्या फांदया विद्युत मंडळाचे सहकार्य घेवून फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच अर्जदाराचे घराचे मागील बाजूस सर्विस लाईन मध्ये नालीच्या काठावर एक महारुग वृक्षांचे वाळलेले झाड आहे. ते मनपा उद्यान विभागाने नियमानूसार काढण्याची कारवाई करावी . १ वाळलेला महारुग वृक्ष तोडण्याच्या कार्यवाही करीता परवानगी उद्यान विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर. जा.क्रं. ८११ दि. ०४/०३/२०२४

<u>ठराव क्रमांक</u> ४:- सदर प्रकरणी फांद्या तोडण्याची व वाळलेला वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

<u>अर्ज क्रमांक ५</u>:- श्री. अविनाश प्र. सावंत सचिव , अमरावती. महानगर जनहित सुरक्षा मंच यांचा तक्रार अर्ज गुलमोहर वृक्ष १

<u>वृक्ष अधिकारी यांचा अहवाल</u> - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. गुलमोहर वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. बाजूलाच श्री. राजेश खत्री रा. मुधोळकर पेठ, अम. यांचे बांधकाम सुरू आहे. त्यांचे बिल्डींग मटेरीयल रस्त्याचे कडेला पडलेले आहे. ते उचलण्याचे पुर्वीच सुचीत करण्यात आल्याचे समजले. वृक्षाला सेन्ट्रींग बांधकाम करणा-यांनी ठोकलेले खिळे काढण्याच्या सुचना श्री. खत्री यांना देण्यात याव्यात झाडाला कोणतीही हानी व इजा पोहचू नये असे आदेशीत करण्यात यावे. गैरअर्जदार यांना नोटीसव्दारे कळविण्यात आले आहे.

<u>ठराव क्रमांक</u> ५:- सदर प्रकरणी गैरअर्जदारास नोटीस देण्यात यावे व झाडास इजा पोहोचवू नये असे आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

<u>अर्ज क्रमांक ६</u>:- श्री. प्रकाश काशीराव पुसतकर हरीओम कॉलनी, शंकर नगर रोड, अमरावती. काशीद वृक्ष १

<u>वृक्ष अधिकारी यांचा अहवाल</u> - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. काशीद वृक्ष विद्युत तारेखाली येतो त्यामुळे त्यांची वाढ खुंटली आहे. वेळोवेळी विद्युत विभागाने फांदया काढल्याने वृक्ष खंगला आहे तसेच वृक्ष लागवड करतांना वृक्ष रस्त्याचे कडेला न लावता रस्त्यामध्ये लावण्यात आल्याने रहदारीला अडचण निर्माण होते सबब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकरत नाही. त्या बदली रस्त्याच्या कडेला १० वृक्ष मनपाने त्या रोडवर लावावीत.

<u>ठराव क्रमांक</u> ६:- सदर प्रकरणी वृक्ष काढण्याची उद्यान विभागामार्फत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ७:- श्री. तेजस केशवराव डांगे सबनीस प्लॉट, बापटवाडी , अमरावती पामवृक्ष ५, पामवृक्ष १ वाळलेला
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक २७/०२/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराकडे ६ पाम वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार आहेत. त्यापैकी १ पामवृक्ष वाळलेला आहे.त्यास काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच इतर सर्व पामवृक्ष सुध्दृढ आहे. अर्जदाराशी चर्चा केली त्यांचे समाधान झाले वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदारास १ वाळलेला पाम वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.
ठराव क्रमांक ७:- :- सदर प्रकरणी इतर पाम वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे व वाळलेला वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ८:- श्री. सुनिल महादेवराव बेडेकर बालाजी प्लॉट, डॉ पानट हॉस्पीटलच्या बाजूला अमरावती. आवळा वृक्ष वाळलेला १
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदार वृक्ष प्रेमी असुन त्यांचे राहाते घराचे परिसरात विविध प्रकारचे ८ -१० वृक्ष आहेत. आवळा वृक्ष वाळलेला असुन त्यास काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बदली वृक्ष लावण्याचे सुचित करण्यात यावे. अर्जदारास १ वाळलेला आवळा वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.
ठराव क्रमांक ८:- सदर प्रकरणी बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ९:- श्री. प्रमोद व्ही . इंगोले उप. अभियंता मध्य झोन क्रं. २ राजापेठ, मनपा अमरावती. कडूलिंग २,आंबा १,मुंगना १ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - उप. अभियंता व सहा. अभियंता मध्य झोन क्रं.२ मनपा यांचा प्राप्त अहवाल प्रभाग क्रं.१८ मधील फरशी स्टॉप ते हरीगंगा आईल मिल कडे जाणा-या डिपी रोडवरील नालीचे बांधकाम करण्याकरीता त्यामध्ये येणारे कडूलिंब २, आंबा १ , मुगंना १, एकूण चार वृक्ष काढण्याकरीता मा. आयुक्त यांचे मान्यतेनूसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली आहे त्याबदली बदलीवृक्ष ४x३= १२ वृक्ष लागण्याची उप अभिंयता व उद्यान विभाग मनपा यांना सुचित करण्यात आले आहे. कार्योतर मंजूरीस सादर . जा . क्रं. ७८४ दि.२१/०२/२४
ठराव क्रमांक ९:- सदर प्रकरणी बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १०:- श्री. प्रमोद व्ही . इंगोले उप. अभियंता मध्य झोन क्रं. २ राजापेठ, मनपा अमरावती. कडूलिंब ४,सुईबाभूळ २,बेल वृक्ष २ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - उप. अभियंता व सहा. अभियंता मध्य झोन क्रं.२ मनपा यांचा प्राप्त अहवाल प्रभाग क्रं.१८ मधिल शंकर नगर ते व्दारकानाथ नगर कडे जाणा-या डिपी रस्त्यालगत नालीच्या बांधकाम करण्याकरीता त्यामध्ये येणारे कडूलिंब ४, सुईबाभूळ २, बेल २ एकूण आठ वृक्ष काढण्याकरीता मा. आयुक्त यांचे मान्यतेनूसार वृक्ष

काढण्याची परवानगी देण्यात आली आहे त्याबदली बदलीवृक्ष ८x३ = २४ वृक्ष लागण्याची उप अभिंयता व उद्यान विभाग मनपा यांना सुचित करण्यात आले आहे. कार्योतर मंजूरीस सादर . जा. क्रं. ७८३ दि. २१/०२/२४

ठराव क्रमांक १०:- सदर प्रकरणी बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ११: – श्री. भालचंद्र व्हि.देशपांडे मुधोळकर पेठ, अमरावती आंबा वृक्ष १

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक ०७/०२/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा ठराव क्रं. ११ नुसार १ आंबा वृक्ष काढण्याच्या बदली बदली वृक्ष लावण्याकरीता नियमानुसार १ x ३ x २००० =६००० रुपये उद्यान विभाग येथे भरणा करण्यास नोटीस देण्यात आले आहे. जा. क्रं. ७९८ दिनांक ०१/०३/२०२४ यानुसार अर्जदाराने दिनांक ०५/०३/२०२४ रोजी विनंती अर्ज सादर केला आहे. अर्जामध्ये अर्जदाराच्या परिसरामध्ये १३ वृक्ष आहे. सदर वृक्ष उन्मरुन पडण्याची शक्यता आहे. (Super Senor) नागरीक आहे. सहानुभुती पुर्वक विचार करावा. ठेव रक्कम रद्द करावी अशी विनंती केली आहे. उचित निर्णयास्तव सादर.

ठराव क्रमांक ११:- सदर प्रकरणी ठेव रक्कम रद्द करता येणार नाही असे अर्जदारास सूचित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १२: – डॉ. सीमा बि. अढाऊ प्राचार्य इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अम. कडुर्निब फांदया अवैध वृक्ष तोड १

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक ०७/०२/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा ठराव क्रं. १८ नुसार १ कडुनिंब वृक्षाच्या फांदया विना परवानगी तोडलया प्रकरणी दंड रक्कम ५०००/- रुपये उद्यान विभाग येथे भरणा करण्यास नोटीस देण्यात आले आहे. जा. क्रं. ८०५ दिनांक ०१/०३/२०२४ यानुसार दिनांक ०६/०३/२०२४ रोजी अर्ज सादर केला. अर्जामध्ये श्री जयसिंग देशमुख हे माझा मोठा मुलगा असुन त्याचा या मालमत्तेशी कोणताही संबंध नाही. मी सध्या ८६ वर्षाचा असुन मला मानसिक त्रास देण्याचा प्रकार आहे. आणि तुम्ही त्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करुन आपण सुदधा मला त्रास देत आहे. महाविद्यालय परिसरातील झाडाच्या फांदया तोडणे आवश्यक होत नाही तर तेथे मोठी जिवितहानी झाली असती झाड पुर्णपणे आम्ही तोडलेले नाही आम्ही झाडाची निगाच करीत आहे व वृक्ष संवर्धनास मदतच करीत आहोत. माझ्या वयाचा व या सर्व बाबीचा विचार करुन माझ्या भाडेकरुंना दिलेला दंड माफ करण्यात यावा हि विनंती.

ठराव क्रमांक १२:- सदर प्रकरणी दंड माफ करण्यात येणार नाही असे अर्जदारास सूचित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १३: – श्रीमती शैला पद्मनाभन कोंडे श्याम नगर गल्ली नं. ३ अमरावती. सागवान वृक्ष ६

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वताःचे राहत्या घराचे परिसरात ८ साग व इतर प्रजातीची २ -३ वृक्ष आहेत. अर्जदार वृक्ष प्रेमी आहेत त्यांना साग वृक्ष काढावयाची आहे. त्यांचेकडे ८ साग वृक्ष आहेत त्यापैकी दक्षिण - उत्तर दिशेला असलेली ६ साग वृक्ष ७० से.मी पेक्षा जास्त बुंदा असलेली साग वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार साग विषयक धोरणानुसार देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १३:- सदर प्रकरणी नियमानुसार ठेव रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १४ :– श्री मंगेश वसंतराव अजमीरे मांगीलाल प्लॉट कॅम्प अम. सागवान वृक्ष ३,कडुनिंब १,चाफा १,भोसा १,बदाम १

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचा रिकामा प्लॉट आहे व त्याला लागुनच राहते घर आहे. रिकाम्या प्लॉट वर नविन बांधकाम प्रस्तावित असुन बांधकाम परवानगी ची प्रत अर्जासोबत लागल्यांचे दिसुन आले. अर्जदाराचे सदर प्लॉटमध्ये छान वाढलेली व हिरवीगार असलेली कडुनिंब १ सागवान ३ भोसा १ चाफा १ बदाम १ इत्यादी ७ मोठी वृक्ष आहेत. स.स.न.र विभागाने दिलेल्या बांधकाम परवानगीचे निरीक्षण केले असता त्यात बांधकामात येणारी व न येणारी वृक्ष चिन्हांकिंत केलेली नाहीत. सबब स.स.न.र विभागाने विकसीत करावयाचे बांधकाम प्लॉटमध्ये असलेल्या वृक्षापैकी काढावयाची वृक्ष जी प्रत्यक्ष बांधकामात येतात ती लाल रंगाने व बांधकामात न येणारी व राखली जाणारी वृक्ष नावासह ग्रीन रंगाने चिन्हाकीत करावी त्यानंतर प्रत्यक्ष काढावयाचे वृक्षाला काढण्याची परवानगी देण्याबाबत हरकत नाही.

ठराव क्रमांक १४:- सदर प्रकरणी स.स.न.र. व बांधकाम विभाग यांचा अभिप्राय घेऊन माझे समक्ष प्रकरण सादर करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १५ :– श्री गोविंद नंदुजी संगेले,बेलपुरा अम. कडुनिंब वृक्ष १ वाळलेले

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कडुनिंब वृक्ष संपुर्ण वाळलेला असुन अर्जदारास नियमानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही करण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वाळल्या वृक्षाचे बदली वृक्ष लावण्याचे सुचित करण्यात यावे. अर्जदारास १ वाळलेला कडुनिंब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.जा.क्रं. ३२ दि. १२/०४/२०२४

ठराव क्रमांक १५:- सदर प्रकरणी बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १६ :– श्री देवचंद नारायणराव गुप्ता गणेश कॉलनी, शिलांगण रोड अम कडुनिंब वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कडुनिंब वृक्ष सार्वजनीक रस्त्याचे कडेला मनपाने लावलेला अंदाजे ४० पेक्षा अधिक वयाचा असुन ९० अंशान वाकलेला आहे. तसेच त्यातुन विद्युत तारा असुन वृक्ष वादळात कोसळण्याची शक्यता दिसुन आली. सबब उद्यान विभागाने नियमानुसार वृक्ष काढण्याची तसेच बदली वृक्ष लावण्याची योग्य नोंद घेवुन कार्यवाही करावी त्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १६:- सदर प्रकरणी उद्यान विभागास वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे व त्याठिकाणी झाडाच्या खोडाचे सौंदर्यीकरण उद्यान विभागामार्फत करण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १७:– श्री भोला महाराज उर्फ शंकर गहेकर विदर्भ प्रदेश अध्यक्ष दलित पँथर गरीब नगर भुतेश्वर चौक अम. कडुनिंब २ गुलमोहर १ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. सबब सामुहिक अर्ज केल्याचे दिसुन आले. विविध कुटुंबाची त्यांचे घराजवळ असलेल्या वृक्षाबाबत तक्रार आहे. प्रत्येक तक्रारदारांचा वेगळा अर्ज घेवुन प्रपत्र सी व डी नियमानुसार सर्व कागदपत्रे जोडण्यास सुचित करण्यात यावे. त्यानंतर प्रकरण निहाय वृक्षाबाबत निर्णय घेता येईल. तुर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे. उच

ठराव क्रमांक १७:- सदर प्रकरणी जागा शासकीय मालकीची असून वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १८:– आर्की अमर अग्रवाल आय. डिस्कव्हरी डेव्हलपर्स प्रा. लि.पेठ अम. सर्व्हे ६ शिट नं. ५६ डी अम. रेल्वे स्टेशन अम. गुलमोहर वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - आय. डिस्कव्हरी डेव्हलपर्स प्रा. लि ला रेल लँड डेव्हलपमेंट अथारीटी दिल्ली कडुन वाणीज्यिक विकासाकरीता हस्तांतरीत करण्यात आलेल्या पेठ अमरावती सर्व्हे ६ शिट नं. ५६ डी मधील ८११५ चौ. मी. प्लॉट साठी वृक्ष संबंर्धन नाहरकत दाखला मिळणेबाबत.अर्जदाराचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज, झाडाचा कलर फोटो, बांधकाम मंजुर नकाशा व खाली प्लॉट चे फोटो सादर करणेबाबत त्रुटी पत्र देण्यात आले आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. तांत्रीक सदस्य यांचा अहवाल घेवुन पुढील सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक १८:- सदर प्रकरणी त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १९:– श्रीमती सुनिता पंजाबराव ढोणे सुशिल नगर अम. कडुनिंब वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दिनांक ०७/०३/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. रस्त्याच्या कडेला मनपाने लावलेला कडुनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने झाडाला घरात घेवुन अतिक्रमण केले किंवा कसे याबाबत अभियंताचा अहवाल मागवावा त्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी मनपा उद्यान विभागास देण्यास हरकत नाही. सदर प्रकरण उप अभियंता झोन क्रं. २ यांचेकडे अहवाल घेण्याकरीता पाठविण्यात आले आहे.

ठराव क्रमांक १९:- सदर प्रकरणी जागा शासकीय मालकीची असून वृक्ष काढण्याची परवानगी रद्द करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २०:– मुख्याध्यापीका विद्या निकेतन प्राथमिक शाळा रामनगर अमरावती. नारळ वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - अर्जदाराचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज, झाडाचा कलर फोटो, घर टॅक्स पावती सादर करणेबाबत त्रुटी पत्र देण्यात आले आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. तांत्रीक सदस्य यांचा अहवाल घेवुन पुढील सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक २०:- सदर प्रकरणी त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २१: – मा. प्रबंधक (का. से. वि) भारतीय जीवन बिमा निगम मंण्डल कार्यालय श्रीकृष्ण पेठ अम अशोका वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - अर्जदाराचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज, झाडाचा कलर फोटो, घर टॅक्स पावती सादर करणेबाबत त्रुटी पत्र देण्यात आले आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. तांत्रीक सदस्य यांचा अहवाल घेवुन पुढील सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक २१:- सदर प्रकरणी त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २२: – श्री विजय संतान उपसंचालक क्रिडा व युवक सेवा अम. विभाग अम. आडजात वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - अर्जदाराचे पत्र प्राप्त झालेले असुन त्यानुसार विहित नमुन्यात अर्ज, झाडाचा कलर फोटो, घर टॅक्स पावती सादर करणेबाबत त्रुटी पत्र देण्यात आले आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. तांत्रीक सदस्य यांचा अहवाल घेवुन पुढील सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात येईल.

ठराव क्रमांक २२:- सदर प्रकरणी त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

## झोन क्र. ३

अर्ज क्रमांक १: – श्री. आनंद खातरकर, अधिक्षक- सिद्धार्थ मुलांचे वसतीगृह, चपराशीपुरा, अमरावती. कडुनिंब ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०१/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सदर ठिकाणी कडुनिंब सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला झुकलेला आहे. वृक्षाच्या झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या मनपा उद्यान विभागा मार्फत काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १:- सदर प्रकरणी उद्यान विभागामार्फत वृक्षाच्या फांद्या तोडण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २: – श्रीमती. ज्योती इंगोले, रा. संजवनी कॉलनी, अमरावती. सागवान १अशोक १ नारळ १

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०१/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. अर्जदाराच्या घरातील आवारात छान वाढलेली व हिरवीगार असलेली ३ वृक्ष (सागवान १, अशोक १, नारळ १) आहे. झाडाचे पाणे पडतात, फार झाडावे लागते असे अर्जदाराचे म्हणणे आहे. सागवान वृक्ष परिपक्क झाला असुन त्यास नियमानुसार काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. नारळ व अशोक वृक्ष सुस्थितीत आहे. सबब नारळ व अशोक वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

ठराव क्रमांक २:- सदर प्रकरणी एक सागवान वृक्ष काढण्याची नियामानुसार अनामत रक्कम स्विकारून परवानगी देण्यात येत आहे व इतर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ३ :– श्री. अजय रामटेके, रा. उत्तम नगर, अमरावती. बदाम १ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०१/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. बदाम वृक्ष अर्जदाराच्या शेजारी श्री.उके यांच्या घराच्या आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाची पाणे अर्जदाराच्या आवारात पडतात त्याचा त्रास असल्याचे समजले वृक्ष तोडण्याची व फांद्या तोडण्याची आवश्यकता नाही. सबब वृक्ष तोडण्याची / फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराच्या घरी एकही वृक्ष लावलेला आढळलेला नाही. करीता अर्जदारास नागरीक्षेत्र झाडांचे सरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार २ वृक्ष लावण्याचे आदेशीत करण्यात यावे व वृक्ष लावल्याचे जी.पी.एस फोटोसह अहवाल ९० दिवसाच्याआत वृक्ष प्राधिकरणला देण्यात यावा. तसे न केल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. असे सुचित करण्यात यावे.

ठराव क्रमांक ३:- सदर प्रकरणी वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे व अर्जदारास २ वृक्ष लावण्याचे आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ४ :– श्री. रमेश संसारे, रा. उत्तम नगर, अमरावती. कडुनिंब ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०१/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कडुनिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला आहे. वृक्षाच्या फांद्या यापुर्वी काढलेल्या दिसुन आले. वृक्षाल इजा पोहचु नये असे सुचित करण्यात यावे. फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

ठराव क्रमांक ४:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे व वृक्ष इजा पोहचु नये असे अर्जदारास सूचित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ५ :– श्री. हरिभाऊ मेश्राम,रा. कैलास नगर, अमरावती. कडुनिंब ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - . ०१/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कडुनिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला आहे. कोणतीही अडचण दिसुन आलेली नाही. वृक्षाच्या बुडा जवळ काँक्रीटी करण केल्याचे दिसुन आले. झाडा जवळील काँक्रीट हटविण्याचे आदेशीत करण्यात यावे. तसेच बाजुचा वृक्ष देखिल अर्धा तोडुन टाकलेला आहे. सदर वृक्ष उद्यान विभागाने तोडला आहे असे सांगण्यात आले. याबाबत विचारण्या करण्यात यावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोहोचु नये असे आदेशीत करण्यात यावे.

ठराव क्रमांक ५:- सदर प्रकरणी वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे व वृक्ष इजा पोहचु नये असे अर्जदारास सूचित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ६ :– श्री. चेतन मनोहरराव वानखडे, रा. प्रशांत नगर, अमरावती. वड १ उंबर १वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०७/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. संकटमोचन हनुमान मंदीर ट्रस्ट अमरावती, यांच्या मालकीचे व रस्त्यावरील जागेत भव्य हनुमान मंदीर असुन भाविकांची सतत वर्दळ असते मंदीराला लागुन वडाचा वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. वड वृक्षाची सतत वाढ झाल्यामुळे मंदीराच्या बांधकामास तडे गेलेले दिसुन आले. सबब नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक ६:- सदर प्रकरणी संयुक्त पाहणी करण्यात यावी व पर्यायी व्यवस्थेबाबत अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ७ :– श्री. सुनिल बळीरामजी गवई, रा. अमर कॉलनी, अमरावती. आंबा ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०७/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. अर्जदार वृक्ष प्रेमी आहे. यांच्या आवारात दोन आंबा वृक्ष व इतरही बरेच वृक्ष आहे. विजेची सर्व्हिस लाईन आंबा वृक्षातुन गेलेली आहे. त्यामुळे अडचणीच्या ठरलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक ७:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ८ :– श्री. वामन सुरळकर, रा. उषा नगर, अमरावती. बकान ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०७/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. बकान वृक्ष रस्त्याच्या कडेला मनपाने लावलेला छान वाढलेला व हिरवागार आहे. विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक ८:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ९ :– श्री. प्रविण उत्तमराव खंडारे, रा. किरण नगर, अमरावती. कडुनिंब १ इतर १ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०७/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कडुनिंब वृक्ष अर्जदाराच्या घरासमोर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक ९:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १० :– श्रीमती. सुनिता पंजाबराव ढोणे, रा. सुशिल नगर, अमरावती. कडुनिंब ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ०७/०३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कडुनिंब वृक्ष रस्त्याच्या कडेला मनपाने लावलेला छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने नजुलच्या जागेत वृक्षापर्यंत बांधकाम केले आहे. अर्जदाराने केलेले बांधकाम हे अतिक्रमण आहे का याबाबतचा अहवाल बांधकाम विभागाकडुन घेवुन वृक्ष तोडण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १०:- सदर प्रकरणी जागा शासकीय मालकीची असून वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ११ :– गैरअर्जदार श्रीमती. जया गवई, रा. सुदर्शन कॉलनी, अमरावती. विनापरवानगी वृक्ष तोडल्याबाबत

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - उपरोक्त प्रकरणात श्री. राम पछेल, रा. सुदर्शन कॉलनी यांनी गैरअर्जदार श्रीमती. जया गवई यांनी विनापरवानगी ३ वृक्ष तोडल्याबाबत तक्रार केली होती. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता गैरअर्जदार श्रीमती. जया गवई यांनी त्यांच्या घरामागील २ वृक्षांच्या फांद्या पुर्णपणे तोडलेल्या आढळल्या त्यानुसार त्यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्याबाबत नोटीस देण्यात आली होती. त्या नोटीसचा त्यांनी खुलासा सादर केला असुन त्यामधे त्यांनी झाडावर चोर चढला होता त्यामुळे वृक्षाच्या फांद्या तोडण्यात आल्या असे उत्तर दिले आहे.

ठराव क्रमांक ११:- सदर प्रकरणी यापुढे विनापरवानगी फांद्या तोडण्यात येऊ नये असे आदेशित करावे अन्यथा त्यांच्यावरती गुन्हा दाखल करण्यात येईल असे अर्जदारास पत्राद्वारे कळविण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १२ : – गैरअर्जदार श्री. नरेंद्र मिरगे, रा. चित्रा कॉलनी, अमरावती. विनापरवानगी वृक्ष तोडल्याबाबत

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - उपरोक्त प्रकरणात श्री. प्रदीप खंडारे व इतर प्लॅट धारक, रा. चित्रा कॉलनी यांनी गैरअर्जदार श्री. नरेंद्र मिरर्ग यांनी विनापरवानगी १ वृक्ष तोडल्याबाबत तक्रार केली होती. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता गैरअर्जदार श्री. नरेंद्र मिरगे यांनी त्यांच्या घरासमोरील १ वृक्ष तोडलेला आढळला. वृक्षाचे खोड शिल्लक आहे. त्यानुसार त्यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्याबाबत नोटीस देण्यात आली होती. त्या नोटीसचा त्यांनी खुलासा सादर केला असुन त्यामधे त्यांनी सदर वृक्षाचा वरील भाग जिर्ण अवस्थेत होता, मागील वर्षी सदर वृक्षाच्या फांद्या माझ्या सदनिकेवर पडुन पॉलीकारबोनेट शीट तुटुन मोठे नुकसान झाले होते. तसेच वृक्ष मोठ्या प्रमाणात बसणाऱ्या कबुतरांचा व ते करीत असलेल्या घानीचा मोठा त्रास जानवत होता. यावृक्षाचा वरचा भाग माझ्या सदनिकेवर पडण्याच्या धोका असल्याचे वाटल्याने भीती पोटी मी आपल्या परवानगी शिवाय वृक्ष मजुरा कडुन अर्धवट तोडुन घेतला हि माझी चुक झाली ती मी मान्य करतो. मला अश्या वृक्ष तोडीबाबत परवानगी घ्यावी लागते याबाबत कल्पना नव्हती मी आपणास आश्वस्त करू इच्छितो की अर्धा तोडलेल्या झाडाच्या बदल्यात मी दहा झाडे लावुन त्याचे संगोपन करील करीता माझ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येवु नये. ही नम्र विनंती असा खुलासा सादर केला आहे.

ठराव क्रमांक १२:- सदर प्रकरणी तीन वृक्षाची अनामत रक्कम ठेव स्विकारून १० वृक्ष लावण्याचे आदेशित करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १३ : – श्री. अनिल कुमार अग्रवाल रा. दस्तुर नगर, अमरावती. गुलमोहर ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. गुलमोहर वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला आहे. वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १३:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १४ : – वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र, अमरावती. पळस १३ कडुबदाम ४ आडजात ३ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे ३ नविन निवास स्थान बांधकामात येणाऱ्या परिसरात ३४ नग वृक्षापैकी बांधकामात येणाऱ्या २० वृक्षे त्यामधे १३ पळस, ४ कडुबदाम, ३ आडजात असे एकुण २० वृक्ष नियमानुसार अनामत रक्कम घेवुन परवानगी देण्यास हरकत नाही. सदर बांधकामाला मनपाची बांधकाम परवानगी घेतलेली आहे.

ठराव क्रमांक १४:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत ठेव रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १५ : – सचिव - श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती. कडुनिंब ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यावेळी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती. कमलताई गवई उपस्थित होत्या. सदर ठिकाणी विपश्यना शिबीराचे बांधकाम करावयाचे आहे. असे

त्यांनी मौकीक रित्या सांगितले. वृक्ष हिरवागार आहे. बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यास नियमानुसार अनामत रक्कम घेवुन वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १५:- सदर प्रकरणी नियमानुसार बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार अनामत रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १६: – श्री. विलास मधुकर घुरडे, रा. अष्टविनायक कॉलनी. जांभुळ ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. जांभुळाच्या झाडा सोबतच कडुर्निंबाचे सुध्दा झाड छान वाढलेले व हिरवेगार आहे. दोन्ही वृक्षांच्य घराकडे येणाऱ्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १६:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १७: – श्री.डॉ. अनिल रोहनकर, रा. विवेकानंद कॉलनी. सागवान ५ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. ५ सागवान वृक्ष परिपक्व झालेली आहे. नियमानुसार अनामत रक्कम घेवुन परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १७:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत रक्कम स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १८: – श्री. शरद नामदेवराव गायकवाड,रा. राहुल नगर, अमरावती. वाळलेला कडुर्निंब ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. कडुर्निंब वृक्ष पुर्णतः वाळलेला असुन अर्जदाराच्या घरात आहे. तोडण्यची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्रमांक १८:- सदर प्रकरणी वाळलेला ०१ कडूर्निंब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक १९: – श्री. विनोद भेंडेकर, रा, देवश्री कॉलनी, अमरावती बदाम ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. बदाम वृक्षाच्या फांद्या अगोदरच तोडलेल्या आढळल्या. याबाबत वृक्ष प्राधिकरणाने निर्णय घ्यावा.

ठराव क्रमांक १९:- सदर प्रकरणी विनापरवानगी वृक्षाचा फांद्या तोडू नये याबाबत अर्जदारास सक्त ताकीद देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २०: – सौ. सुरेखा सुर्यकांत देशमुख, रा. कॅम्प, अमरावती. आकाशनिम ०२ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सार्वजनिक जागेवरील दोन्हीही आकाशनिमच्या वृक्षांना उदळी लागलेली आहे. तसेच वृक्षांच्या फांद्या ईलेक्ट्रीक वायर मधे गेलेल्या आहे. उद्यान विभागाने शक्तिमानव्दारे दोन्ही वृक्ष काढुन घ्यावी.

ठराव क्रमांक २०:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २१ : – श्री.अमोल दहिकर, रा. चैतन्य कॉलनी, अमरावती. सागवान ३ शिवन १ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सागाची ३ वृक्षे परिपक्व झालेली आहे.नियमानुसार अनामन रक्कम घेवुन तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नही. तसेच १ शिवन वृक्ष हिरवागार आहे. सबब शिवन वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.
ठराव क्रमांक २१:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत रक्कम ठेव स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष ३ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे व एक शिवन वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २२ : – श्रीमती. कविता सिंगवी,रा. हरीओम कॉलन, अमरावती. कडुनिंब ०१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सार्वजनिक जागेवरील कडुनिंब वृक्षाच्या विद्युत तारेकडील व अस्तव्यस्त वाढलेल्या फांद्या उद्यान विभागाव्दारे काढण्यात याव्या.
ठराव क्रमांक २२:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २३ : – श्री. ओमप्रकाश कासट, रा. स्वास्तिक नगर, अमरावती. निलगीरी १ आकाशनिम २ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. १३/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. २ आकाशनिम व एक निलगीरी वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.
ठराव क्रमांक २३:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २४ : – श्रीमती पुष्पा गवई रा. लुंबीनी नगर, अमरावती पिंपळ ०१ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि. ७/३/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता पिंपळ वृक्ष अर्जदाराच्या आवारात असुन छान वाढलेला आहे. विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.
ठराव क्रमांक २४:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**झोन क्र.४**

अर्ज क्रमांक १ :- तक्रारकर्ता - श्री मारोती संस्थान, आझाद चौक, जुनीवस्ती, बडनेरा. आंबा ३५ वृक्ष
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - सदर तक्रारीवर शेत सर्वे नं ३३०/१ मौजे बडनेरा येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर सदर शेतातील ७/१२ वर नमुद असलेली ३५ आंब्याची झाडे अवैधरित्या कटाई केल्याचे निदर्शनास आले आहे. करीता सदर ७/१२ नुसार

१. श्री वसीमउद्दीन रफीकउद्दीन
२. श्रीमती राजेकुन्नीसा शेख अजीज
३. श्री नसीमउद्दीन रफिकुद्दीन
४. श्रीमती तमिजाबी रफिकुद्दीन

५. श्रीमती सादेकुन्नीसा अब्दुल फहीम
६. अजीमउद्दीन रफिकुद्दीन
७. श्रीमती हमीदाबानो अ. नदीम

• असे एकुण ७ नामे खुलासाची नोटिस जा.क्र. अमनपा/द.प्र./सआ/४७६/२४ दि ०१.०४.२०२४ बजाविण्यात आली आहे. परंतु सदर गैरअर्जदार यांनी अद्याप पावेतो कोणताही खुलासा या कार्यालयात सादर केलेला नाही.

सदर अहवाल आपल्या माहिती व पुढील कार्यवाही करीता सविनस सादर

ठराव क्रमांक १:- सदर प्रकरणी अर्जदारास नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा खुलासा सादर न झाल्यास दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**झोन क्र. ५**

अर्ज क्रमांक १ :– श्रीमती उज्वला सतीश इरपाचे गांधी आश्रम,अमरावती. उंबर ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि 22/02/24 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता अर्जदाराचे घराजवळ नालीचे काठावर सव्हीस लाईल जागेत उंबर वृक्ष वाढलेले आहे त्यामुळे नाली सतत क्रक होत तसेच अर्जदाराच्या कंपाउंड वाल खचत आहे अर्जदाराचे घरी वृक्ष लावलेले दिसुन आली सबब उबर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही. त्याबबदल वृक्ष लावण्याचे कळविण्यात यावे परवानगी देण्यात आली कार्यउत्तर मंजुरीस सादर

ठराव क्रमांक १:- :- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत रक्कम ठेव स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक २ :– श्री.शशांक दत्त तांबेकर अंबा विहार अमरावती गुलमोहर वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि 22/02/24 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता गुलमोहर वृक्ष सार्वजानिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेले आहे कोणतीही अडचण दिसुन येत नाही सदर वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी परवानगी नाकारण्यात आली आहे. कार्यउत्तर मंजुरीस सादर

ठराव क्रमांक २:- सदर प्रकरणी वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ३ :– श्रीमती रशिदा बी शेख रईस टीचर कॉलनी अमरावती आडजात ०१ वृक्ष

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि 22/02/24 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता गुलमोहर वृक्ष सार्वजानिक जागेवर रस्त्याच्या कडेला वाढलेले आहे परंतु वृक्ष वाळलेले असल्याने तो वृक्ष काडुन त्या जागेवर स्थानिक प्रजातीचे वृक्ष लावण्याचे कळविण्यात यावे सदर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली व त्या जागेवर स्थानिक प्रजातीचे वृक्ष लावण्याचे कळविण्यात आले कार्यउत्तर मंजुरीस सादर

ठराव क्रमांक ३:- सदर प्रकरणी नियमानुसार अनामत रक्कम ठेव स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्रमांक ४ :– श्रीमती सविता प्र खोत भाजीबाजार अमरावती वड वृक्ष ०१

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि 22/02/24 रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले असता वड वृक्ष छान वाढलेले आहे. अर्जदाराच्या घरावर मोठमोठ्या फांदया येल आहे. वृक्षाचा घेर ( ४ ते ५) इंच व्यासाच्या फांदया कमी करून वृक्षाचा तोल बिघळणार नाही या पध्दतीने कार्य करावा सदर वृक्षाच्या फांदया मोठ्या प्रमाणात वाढल्या असुन फांदया छाटण्याची गरज असल्याचे दिसुन येत आहे. तरी फांदया छाटण्याची परवानगी देण्यात येत आहे. कार्यउत्तर मंजुरीस सादर

ठराव क्रमांक ४:- सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

आयुक्त
महानगरपालिका,अमरावती